Vol. 7, Issue 5, Feb 2018 ISSN 2249-894X

# REVIEW OF RESEARCH

*An International Multidisciplinary Peer Reviewed & Refereed Journal*

**Impact Factor: 5.2331**

**UGC Approved Journal No. 48514**

**Chief Editors**
Dr. Ashok Yakkaldevi
Ecaterina Patrascu
Kamani Perera

**Associate Editors**
Dr. T. Manichander
Sanjeev Kumar Mishra

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

# अण्णाभाऊ साठे यांची साहित्य संपदा व जीवन – आर्थिक क्रांतीसाठी प्रेरणा – एक अवलोकन

सहा. प्रा. जयंत एम. बनसोड
वाणिज्य विभाग, गो. सी. टोम्पे , महा. चादूर बाजार, जि. अमरावती.

**प्रस्तावना :**

आजच्या जागतिकीकरणाच्या काळात सर्वसामान्य माणसाला आर्थिक जीवन जगणे कठिण आहे. परंतु लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची 2020 मधे जन्मशताब्दी वर्ष येत आहे. म्हणजे 100 वर्षाच्या काळात अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत व सर्वसामान्य लोकांना धड जगू न देणारी व शोषण करणारी समाज व्यवस्था चिघडवून आपले जीवन व्यतित केले. या समाज व्यवस्थेत त्यांनी आपल्या हयातीत अंत्यत वादळे झेलीत, काळावर व परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न करीत, काळावर स्वार होण्याचा प्रयत्नच खऱ्या अर्थाने सर्वसामान्य माणसाला जगण्याची प्रेरणा देत राहतो.

त्यांचे जीवन मांतगाच्या वसतीमधून सुरू झाले व हयातीभर व्यवस्थेच्या विरूध्द बंड पुकारून शोषणाधिष्ठीत व्यवस्था उलथवून टाकणारी आर्थिक क्रांती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अण्णाभाऊ सतत लढत राहीले म्हणूनच त्यांनी परिस्थितीचे रडगाणे न मांडता सतत लढत राहणे (संघर्श करणे) मान्य केले. त्यांनी आपल्या लेखणीतून स्पष्ट स्वाभीमान जागृत ठेवून मला परिस्थितीशी लढणे मान्य आहे. परंतू ती समोर करून रडत राहणे, दुसऱ्याच्या देयवर कृपेवर जगणे मान्य नसल्याचे ठणाकवून सांगीतले. ते सामाजिक सांस्कृतीक परिस्थिती कषी विपरीत आहे व यामधून सर्वसामान्यांवर होणारे अन्याय अत्याचार, समाजाचे वास्तव चित्रण, स्वातंत्र्यांच्या लढयात लढणारे सैनिक, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत प्राणाची पर्वा न करता उतरणारे कार्यकर्ते तमाशातील गायक, कलाकार या माध्यमातून कलापथक, दंडार, यामाध्यमातून लोकजागृती करणे समाजातील अनिष्ठ रूढी परंपरा यावर प्रहार करून अंधश्रध्दा नाहीषी करणे. तसेच मुंबईतील कामगार, कामगार वसाहत, त्यांच्या समस्या पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांची होणारी ससेहेलपट याचे वास्तव चित्रण व त्यातून जागृती व क्रांती निर्माण करण्यांचे काम आपल्या साहित्य संपदेतून केल्याचे दिसते.

गिरणी कामगार, कामगार संप, मालकाकाडून आर्थिक, सामाजिक, लैंगीक होणारे शोषण याविरूध्द आवाज उढविण्याचे व लोंकामध्ये जाणीव जागृती निर्माण करण्याचे कार्य ते अविरत करीत राहीले. ज्ञानाची साधना करणे, झोपडपट्यांमधील माणसाचे जगणे, त्यांचे जीवनाचे हुबेहुब चित्र कथा व कांदबरीत प्रगट केले. पोवाळे गावून जी बक्षिसी मिळेल त्यातून शेजारच्यामुलींना बांगडया भरून त्यांच्याप्रती मातृभाव प्रगट करणे त्यांनी आपली फकिरा कांदबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अर्पण केली.

अण्णाभाऊ सुरूवातीला साम्यवादी विचार सरणीकडे झुकले परंतु भारता सारख्या जाती प्रधान देशात ते शक्य नाही म्हणून समता, स्वातंत्र्य, बंधुत्व व न्याय सांगणारे तथागत भगवान बुध्द, चार्वाक संत कबीर, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची समतेची विचार सरणी अंगीकारण्याचा प्रयत्न केला.




आपल्या शाहीरिच्या माध्ममातून दुःख वेदना बोलक्या केल्यात. छत्रपती शिवाजी महाराजांना स्वातंत्र्याची गुढी उभारण्यासाठी ज्या मावळयांनी त्यामधे रामोषी, भिल्ल, मांग, मांग गारोडी यांनी जीवाची बाजी लावून देशाप्रती समर्पण केले अशा महान घराण्याचा वारसा अण्णाभाऊंना लाभला होता. आपल्या लेखणीतून पराक्रमाची गाथा, मातंगाचा त्याग, देशभक्ती व लहुजीचा त्यागाचा मार्ग त्यांनी निवडला. व काटेरी मार्गावरून चालत नविन पायवाट निर्माण केली.

नव्या माणसांचे जग साहित्यातून निर्माण केले. दलित सहित्य, शोषीत साहित्य निर्माण करून सर्वांना क्रांतीची प्रेरणा देणारे व झोपलेल्या

माणसाला जागे करणारे वास्तववदर्शी साहित्य निर्माण केले यामूळे त्यांच्या जीवनपटातून व साहित्यातून जागतिकीकरणातील जीवनाचा प्रवास करणे सुखकर झाले. त्यांनी आपल्या साहित्यातून मानवी जीवन, गाथा शब्दांकीत केली, कथा, कांदबरी, लोकनाटय, पोवाडा, छक्कड, नाटक, प्रवासवर्णन, चळवळीची गाणी यामधून समाजाला गती देण्याचे कार्य केले. म्हणूनच आंबेडकरी जल से सत्यशोधक जलसे कामगारांना अर्थक्रांती घडविण्याची प्रेरणा देत होते.

1944 साली टिटवाळा येथील शेतकरी परिषदेत भारतीय शेती, शेतकरी, शेतमजूर यांची व्यथा मांडून भारतीय शेती अर्थव्यवस्था सर्व सामान्य माणसाचे कसे शोषण करणारी आहे व यासाठी त्यांनी लोकांना आंबेडकरांनी सांगीतलेला 'गुलामाला गुलामीची जाणीव करून दया म्हणजे तो बंड करून उठेल'' हा मंत्र सोबतच आज आमची जी अवस्था आहे याचे चित्रण महात्मा फूले यांनी सांगीतलेल्या ''विद्ये विना मती गेली, मती विना गती गेली, गती विना वित्त गेले, वित्त विना शुद्र खचले, एवढे अनर्थ एका अविद्येने केले'' म्हणजे आमच्या अवस्थेकरीता आम्हीच जबाबदार आहोत कारण आम्हांला शिक्षण नसल्यामुळेच जो येतो तो आमचे शोषण करतो व गुलाम बनवितो तेव्हा शिक्षण घेवून गुलामीच्या बेडया तोडून टाकण्याचे आव्हान केले.

जगाचा पोशींदा कसा गुलाम आहे व ही दैववादी संस्कृती त्याला अंधश्रध्देत खितपत पडून राहण्यास सांगते व ते कसे नुकसानकारक आहे हे सांगून हि श्रृंखला तोडून संघर्ष करण्यासाठी तत्पर राहण्याचे आव्हान केले. त्यांनी स्त्री हि नायीका, स्वतंत्र बाण्याची, बंडखोर, नव्या युगाला गवसणी घालणारी, जागतिकीकरणात टिकणारी, सामर्थ्यवान, शिलवान स्त्रीचे चित्र निर्माण केले. त्यांनी विठू महार, बुध्दाची शपथ, सोन्याचा मणी या कथामधून डॉ. बाबासाहेब आंबडेरांना अपेक्षीत वादळ भाववृत्ती जागाविण्याचा प्रयत्न केला.

आज त्यांचे साहित्य जागतिक स्तरावर पोहोचले आहे. त्यांनी आयुष्यभर दारीद्रयाची चादर पांघरून सामाजिक चळवळ पुस्तकरूपाने जीवंत ठेवण्याचे कार्य केले परंतु त्यामधे स्वतःच्या स्वाभीमानाला कुठेही धक्का लागू दिला नाही.

त्यांनी वाटेगाव ते मुंबई हा 250 कि. मी. चा प्रवास पायी, सहा महिण्याचा प्रवास, आणि मुंबई ते रशिया हा आंतरराष्ट्रीय प्रवास केला. त्यांचा हा प्रवास म्हणजे पोटासाठी घेतलेला शोध होता. गावातील जीर्ण व्यवस्था, त्यातील घुसमट, पोलीसांचा ससेमिरा यातून सुटका करून घेण्यासाठी धडपडणारे बालपणाने केलेली बंडखोरी मनात घेवून त्यांनी हा जीवघेणा मार्ग पत्करला. मुंबईतील चाळीतील माणसांचे वास्तव्य जगणे पाहिल्यानंतर बुध्दाने दुःख मुक्तीचे मूळ शोधून मुक्तीचा मंत्र (मार्ग) दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुध्द, कबिर, फुले यांना गुरू माणून ज्ञानाच्या प्रकाशात अंधार युगाची वाट धरली व प्रकाशाचे दैदिप्यमान नवयुग निर्माण केले. त्यानुसार अण्णाभाऊंनी अज्ञानाच्या वाटेवर चालणाऱ्या बहुजन, दलित, शोषीत, पडित लोकांच्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी लेखणी झिजविली.

शोषणमुक्त समाज, शोषणमुक्त देशनिर्माण करणे हे स्वप्न होते 'भुक आणि भिक' हे याचा शोध घेणारा कलावंत हा कलामूल्ये व जीवनमूल्ये यांची सांगड घालतो. हा विज्ञानवादी कलाकार होता व जातीअंताचा लढा निर्माण करण्यासाठी गीत, पोवाडे, लावणी या कलेतून जागा होतो. जुन्या दृष्ट चालीरिती नष्ट व्हाव्या, आपसातील वैर नष्ट व्हावे. आपसातील दृष्टपणा याचे परिणाम, त्यामूळे इतर लोक कसे फायदा घेतात, नवमहाराष्ट्रात सलोखा सांमजस्य वाढवावे विषमता नष्ट व्हावी समाज सत्तावादाचा अरूणोदय पहावा या दृढनिश्चयतेने त्यांनी बहारदार लेखन केले त्यांची भाषा ही मनाच्या अंतरंगाला भिडणारी आहे. 'जग बदल घालून घाव / मला सांगून गेल भिमराव' या गितातील विद्रोही बाणा स्पष्ट होतो.

आजच्या जागतिकीरणाच्या काळात अण्णाभाऊचे क्रांतीकरी विचार, तत्वज्ञान संपविण्यासाठी प्रस्थापित व्यवस्था प्रयत्न करीत आहे. पंरतू समाजाच्या आर्थिक सामाजिक, सांस्कृतीक प्रगतीसाठी अण्णाभाऊंची चळवळ, विद्रोही कविता, कथा, कांदबऱ्या हे साहित्य, प्रेरणादायी ठरणार आहे. तेव्हा अण्णाभाऊंचा विचार जागृत ठेवण्यासाठी विचाराचे प्रचारक बनण्याची क्रिया वेगाने व निस्वार्थपणे करण्याची आवश्यकता आहे. देशात बळीची पंरपरा आह म्हणजे समाजात नविन काही करायचे असेल तर कोणाला तरी आपला बळी दयावा लागेल. हि व्यवस्था प्रत्येकाला स्वाथी, मतलबी, आप्पलपोटी बनविणारी आहे यामधे स्वार्थाचा बळी दिला तरीसुध्दा अण्णाभाऊंचे विचार जीवंत राहतील व येणाऱ्या पिढीस आर्थिक क्रांतीची प्रेरणा देत राहतील.

आज बहुजन समाज (मागास व अतिमागास) समाज खेडयापाडयात, दऱ्या खोऱ्यात व शहरातील झोपडपटयामधे राहतो, त्यांना आपली हि परिस्थिती कशामूळे आहे याची पूर्ण जाणीव झाली आहे व यावर बुध्दाने सांगीतलेला 'अत्त दिप भवः' स्वयंप्रकाशीतज व्हाः' म्हणजेच स्वत'चा मार्ग स्वतः निवडा, त्यासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे कळून चुकले आहे. कारण ''शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे. ते जो प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही'' – डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांनी सांगीतलेल्या उपायाचा प्रत्येकाने अवलबं केल्यास समाजाचा उध्दार झाल्याशिवाय राहणार नाही. त्यांनी आपल्या जीवनात अनेक प्रलोभनाला बळी न पडता त्यांना दूर सारून आयुष्यभर डोंगर उपसून दारीद्रयान जीवन कंठले, लाचारीला स्पर्श केला नाही त्यामुळेच स्वाभीमानाचे उंच शिखर त्यंना गाठता आले. त्यांचा हा आदर्श डोळयासमोर ठेवून समाजाने आचारण बदलावे म्हणजेच त्यांच्या अर्थक्रांतीतून जगण्याची प्रेरणा मिळेल.

अण्णाभाऊ हे जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांच्या कथा लिहिणारे, वास्तववादी परिस्थिती वर भर देणारे, भांडवलदार, जमीनदार यांचेकडून होणारे शोषण, समाजातील दारीद्रय, गरीबी बेकारी, महिलावरील अन्याय, अत्याचार, लैंगीक शोषण या विविध विषयांवर लिखाण करून समाजातील सर्वात खालच्या घटकाला जीवन जगण्याची व परिस्थितीच्या विरूध्द संघर्ष करण्याची प्रेरणा देणारे साहित्य निर्माण केले.

अण्णाभाऊच्या शाहीरी कार्यक्रमाची सुरूवात देव देवतांच्या स्तवनाने होत नसून कामगार श्रमीक, कष्टकरी, महिला यांना वंदन करून कार्यक्रमाची सुरूवात होत होती. यातूनच इतरांनी प्रेरणा घ्यावी. पृथ्वी हि शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती प्रत्यक्षात कष्टकरी, श्रमीक, कामगार यांच्या तळहातावर तरली आहे. हे सांगूनच प्रबोधन करण्याचे कार्य केले. त्यांचे साहित्य प्रामुख्याने स्त्रीचे शील, पुरूषाचा स्वाभीमान, देशाचे स्वातंत्र्य आणि सामाकि समता या चार विषयामध्येच व्यापलेले दिसते.

''स्मशानातील सोन, कब्र का सोना, मरघट का सोना, Golden Man in Grow या नावाने मराठी हिन्दी व इंग्रजी कांदबरी प्रसिध्द होवून जागतिक स्तरावर प्रसिध्द झाली. त्यांच्या साहित्य कृतीतून आर्थिक पाठबळ मिळालेच परंतू त्याबरोबरच विचार विवेक जागृत होवून जीवन जगण्याचा मुलमंत्र सापडला. दु:खाच्या पातळी वरची वेदना संवेदना जेव्हा काळजाला आरपार भिडते तेव्हा जात पात धर्म पंथ प्रांत भाषा देश यांच्या सिमा त्याला बंदीस्त करू शकत नाहीत.

समाजातील चार्तुवर्ण्य समाज व्यवस्थेने शुद्र अतिशुद्रांना लिहिणे, वाचणे नाकारले व त्यांच्या स्वातंत्र्य व अधिकारावर गदा आणली. हि चौकट फूले, शाहू, आंबेडकर यांनी मोडली यांच्या विचाराची कास धरूनच अण्णाभाऊंनी मार्गक्रमण केले व दलित शोषीत पडित लोकांच्या व्यथा, वेदनांना वाचा फोडली. त्यांचे संपूर्ण साहित्य हे देशाचे स्वातंत्र्य, माणसाचा स्वाभीमान व महिलेचे शील या तत्वावर आधारीत आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात, ''कला हि झोपडीत जन्माला येते व राजमहालात दुसऱ्याचे रक्त पिणारे ढेकूणच जन्म घेतात.'' हे वास्तव खरे ठरले व आजही शिक्षण घेवून आयएएस, आयपीएस अधिकारी झोपडीतूनच जन्मलेले दिसतात तसेच समाजिक चळवळ उभी करणारे झोपडीतच दिसतात कारण त्यांचे पोटात भूक असते व ती भागविण्याकरीता चळवळी उभ्या कराव्या लागतात. पोरगा शिकावा म्हणून अण्णाचे आईवडील म्हणतात. ''तुका म्होलई वंगाळ दिस येणार हायतीं, शिकला तर बर होईल'' असे सांगणाऱ्या वडीलांना अण्णा म्हणतात मला तुम्ही मुंबईला घेवुन चला मी शाळेत गेलो नाही तरी शाळा शिकणार आहे. मी माझ्या कलेवरच फक्कळ पैसा मिळवून दाखवितो हे आश्वासन त्यांनी वडीलांना दिले यामधे त्यांचा करारीबाणा स्पष्ट होतो.

डॉक्टर एकावेळी एकाचीच नाडी तपासतो परंतु शाहीर एकाचवेळी अनेकांची नाडी तपासतो. म्हणूनच त्यांना लोकशाहीर म्हणतात. समाजाची आर्थिक नाडी तपासण्याचे कार्य अण्णानी आपल्या हयातील केले व त्यावर योग्य उपाय सूचविला.

अण्णा ज्या परिस्थितीत जगले व आपला स्वाभीमान न सोडता जीवन अत्यंत दरीद्रय हालअपेष्ठा सहन करीत व्यथित केले या त्यांच्या जीवनातून स्वत:तील स्वाभीमान जागृत करावा व आपलेही जीवन व्यतित करावे. त्यांनी आपल्या साहित्य कृतीतून वास्तववादी दु:ख दैना प्रगट केली यामधूनही आर्थिक क्रांती करण्याची प्रेरणा सर्व सामान्य व्यक्तिंनी घ्यावी.

## *निष्कर्ष :*

1) अण्णाभाऊंचे जीवन व कार्य सतत सर्वसामान्य व्यक्तिला परिस्थितीवर मात करण्याची प्रेरणा देते. व जगण्यासाठी संघर्ष कसा करावा हि प्रेरणा मिळते.
2) परिस्थितीवर न रडता सतत लढत राहणे हा मूलमंत्र त्यांनी स्विकारला. त्यानुसार स्वाभीमानी जीवन जगले.
3) त्यांनी समाजातील अनिष्ठ रूढी परंपरा, चालीरिती यावर प्रहार करून समाजातील अंधश्रध्दा दूर करण्याचा प्रयत्न केला व सदैव विज्ञानवादी दृष्टीकोन बाळगला.
4) त्यांनी सुरूवातीला साम्यवादी (कॉमरेड) विचार सरणीचा स्विकार केला तरी शेवटच्या काळात बुध्द, कबीर, फूले, शाहू, आंबेडकर यांनी परिवर्तनवादी समता स्वातंत्र्य बंधुत्व व न्यायाचा पुरस्कार करणारी विचारसरणी स्विकारली.
5) भारतीय शेतकरी, शेतमजूर कष्टकारी यांची व्यथा शेतकरी परिषदेच्या माध्यमातून विषद केली व हि व्यवस्था यांच्या कशी विरोधी व विनाष करणारी आहे हे पटवून दिले.
6) दैववादी, जैसे थे वादी, नशिब, तकदीर हि संस्कृती माणवाचा कसा घात करणारी आहे. व यातून मार्ग दर्शविणारी तथागत बुध्दाची विचार सरणी, फुले शाहू आंबेडकरांचे विचार कसे प्रेरक व विकासाकडे वाटचार करणारे आहेत हे पटवून दिले.
7) आजच्या जागतिकीकरणाच्या काळात अण्णांचे साहित्य, परिवर्तनवादी विचार, फुले शाहू, आंबेडकर विचार सरणी नेस्तनाबूत करून तोडून मोडून सांगण्याचा प्रयत्न होतांना दिसतो याला वेळीच आवर घालण्यासाठी समाजात जाणीव जागृती होणे आवश्यक आहे त्यादृष्टीने समाजाने पेटून उठणे व जागृत राहणे हिच काळाची गरज आहे.

8) पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर उभी नसून ती कामकरी, कष्टकऱ्याच्या तळहातावर अवलंबून आहे.
9) देशात कार्यक्षम लोकसंख्या जास्त असतांनाही दारीद्रय, बेकारी, उपासमार मोठया प्रमाणात असून भांडवलदार व जमीनदाराकडून शोषण होत आहे.
10) कोणतीही कला, कलाकार, गुणवान व्यक्ति हा झोपडीत दारीद्रयात जन्म होतो व राजमहालात गुंड बदमाश शोषण करणारा जन्म घेतो असे तुकडोजी महाराज म्हणतात हे वास्तवदर्शी म्हणजे खरे आहे.

अण्णाभाऊ साठेचे विचार, साहित्य संपदा व जीवन हे माणवास सदैव आर्थिक, सामाजिक सांस्कृतीक क्रांती करण्यासाठी प्रेरणा देत असतील व यातूनच चळवळी जीवंत राहतील.

**संदर्भ :**

1)श्रमाचे अर्थशास्त्र डॉ. प्रभाकर देशमुख
2)विकासाचे अर्थशास्त्र – डॉ. ज्योत्सना देशपांडे
3)Dr. Ambedkar Approches to Buddhisum – डॉ. भालचंद्र मुनगेकर
4) आर्थिक जगत – डॉ. दिव्य जाहागीरदार
दै. लोकसत्ता
दै. दिव्य मराठी – भुके कंगाल लोकशाही दि. 22 आक्टो 2017
दै. मतदार
लोकराज्य मासीक
योजना मासीक
अर्थसंवाद मासीक



सहा. प्रा. जयंत एम. बनसोड
वाणिज्य विभाग, गो. सी. टोम्पे , महा. चादूर बाजार, जि. अमरावती.